ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यकालीन महाविद्यलयीन शिक्षक


**— प्राचार्य डॉ. वाघमोडे गणपती रामहरी.**
*लक्ष्मीबाई म्हेत्रे कॉलेज ऑफ एज्युकेशन अक्कलकोट, जि. सोलापूर.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :—**

बदल हा निसग्राचा नियम आहे. स्थितीशील असे काहीच नाही. आज सर्वच क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेच्या युगात जर आपणास टिकायचे असेल तर आपले सर्व उपक्रम आपणास आजच्याच दृष्टीने नव्हे तर भविष्यकाळातही कसे उपयुक्त ठरतील याचा विचार करावा लागेल. वर्तमानाच्या खांद्यावर बसून भविष्याचा वेध घ्यावा लागेल. शैक्षणिक उपक्रम भविष्याभिमुख बनवावे लागतील. शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या शिक्षणाचा भविष्यात डोकावून डोकावून विचार करावा लागेल. गतिमान समाज स्थिर शिक्षणपध्दती सहन करणार नाही. तसेच गतिमान शिक्षणपध्दती स्थिर अध्यापक शिक्षण खपवून घेणार नाही. म्हणून याबाबत केवळ आजचाच नव्हे तर उद्याचा विचार करणे अधिक गरजेचे आहे. राष्ट्राचा दर्जा लोकंना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो, शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते तर शिक्षकांची गुणवत्ता ही शिक्षक शिक्षण कार्यक्रमांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते.

खाजगीकरण, उदारीकरण जागतिकीकरण ह्या तिन्ही घटकांना चालना देण्यात आर्थिक घटकाइतकाच माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान हा घटकही. महत्वाचा आहे. पूर्वी शिक्षकाच्या अध्यापनाला महत्व होते. माहितीचा मुख्य स्त्रोत हा शिक्षकच असे. अलीकडच्या या विविध तांत्रिक बदलामुळे स्वयंअध्यायनाला महत्व आले. अध्ययनासाठी ज्ञानाचे अनेक स्त्रोत उपलब्ध झाले आहेत. शिक्षण हे विद्यार्थी केंद्री झाले आहे. शिक्षणात Friendlyness ही संकल्पना आली आहे.




(१) **व्यवस्थापक :—** शाळेत विविध प्रकारचे अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रम होतात. दरम्यान दैनंदिन शालेय कामकाजही सुरूच असते. यादृष्टीने योग्य वेळेला योग्य निर्णय घेणे शिस्तीची अंमलबजावणी करणे शाळेचे वातावरण बिघडणार नाही. याची काळजी घेणे व सर्व बाबींची उत्तम व्यवस्था ठेवणे.

(२) **संधी उपलब्ध करून देणारा :—** विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवडी निवडी, कल, गुणवैशिष्ट्ये विचारात घेऊन शिक्षकाने संबंधित विद्यार्थ्यांना संबंधित कार्यक्रमात, उपक्रमात भाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययाने शिकता यावे ह्यासाठी चर्चामंच उपयुक्त ठरतात यासाठी शिक्षकाला Online Forms चा वापर करावा लागेल. स्वयंअध्ययनात आलेल्या अडचणींचे निरीक्षण करीत असतात त्यांचे सुप्त गुण ओळखुन पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन न ठेवता शिक्षकाने विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून द्याव्यात.

(३) **संशोधक :—** शिक्षकाने स्वत:च्या अध्ययन — अध्यापन प्रक्रियेतील विविध घटकांवर संशोधन करून स्वत:ची परिणामकारक अध्यापन पध्दती निश्चित करावी, सखोल ज्ञान मिळवावे व या सर्व अभ्यासातून विद्यार्थी, वातावरण, अध्ययन पध्दत यात सुधारणा करावी. चिंतन, मनन व प्रयोग करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे. पुढील काळात आपल्याला e-teaching करावे लागणार आहे. e-learning साठी अध्ययन साहित्य तयार करणे आणि त्याचा वापर करून त्याची परिणामकारकता संशोधनाच्या आधारे पडताळणे हेही महत्वाचे कार्य आहे.

(४) **मूल्यमापक :—** अध्ययन—अध्यापन क्रिया म्हटले की मूल्यमापन येतेच माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाआधारे विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष संपादन आपल्याला मोजावे लागेल. त्यासाठी शिक्षकाला मूल्यमापनासाठी शैक्षणिक सॉफ्टवेअर विकसित करावे लागतील. संगणकासाठी आपण तयार केलेले अध्ययन साहित्य आणि अभ्यासक्रम यांचेही मूल्यमापन करावे लागेल या सर्व

भूमिकेसाठी आवश्यक असलेले कौशल्ये प्रथम शिक्षकाला प्राप्त करावी लागतील व झालेल्या चुका विद्यार्थ्यांना सांगून प्रत्याभरण देवून उपचारात्मक अध्यापन करावे लागेल.

(५) **मार्गदर्शक :—** शिक्षक हे विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान असते. त्यामूळे शिक्षकाला विद्यार्थी अध्ययन करताना त्याला येणाऱ्या शैक्षणिक अडचणींसाठी तसेच भावनिक आधारासाठी मार्गदर्शकाची / समुपदेशकाची भूमिका बजवावी लागते.

**(६)संप्रेषक :—** माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात सर्वात महत्वाची भूमिका संप्रेषकाची बजावावी लागते. संगणकाच्या आधारे संप्रेषणाचे मार्ग कोणते? ती माहिती मिळवाची लागते त्यानंतर योग्य प्रभावी वापरासाठी नियोजन करावे लागते. संदेशाचा नेमका आशय निवडणे व संदश पाठवण्याची कौशल्ये आत्मसात करणे गरजेच आहे. त्याचबरोबर संगणकाद्वारे परिणामकारक सादरीकरणासाठीची तंत्रे व कौशल्ये आत्मसात करावी लागतील.

(७) **दिग्दर्शक :—** या माहिती तंत्रज्ञान युगात विद्यार्थी स्वयंअध्ययनाने किंवा दुरस्थ पध्दतीने शिक्षण घेताना ते आभासी प्रयोगशाळांचा वापर करतील त्या शाळेचा वापर कसा करावा? याबद्दल मार्गदर्शन करावे लागेल याच बरोबर आभासी वर्गात मध्ये आपण तज्ञ म्हणून काम करताना काही व्याख्या दिग्दर्शन दाखवावे लागतील त्याची ज्ञान प्राप्ती करावी लागेल व कौशल्य अध्ययनात दिग्दर्शनास महत्व असते त्यामूळे शिक्षकाला हि महत्वाची भूमिका पार पाडणे अत्यावश्यक आहे.

**(८)आजीवन अध्ययनार्थी :—** शिक्षक हा स्वत: नेहमी अद्ययावत असला पाहिजे व या अद्ययावतता राखण्यात शिक्षकाला अजीवन विद्यार्थी राहण्याशिवाय पर्याय नाही तसेच त्याने आपल्या विद्यार्थ्यालाही अजीवन विद्यार्थी बनवावे लागेल. अध्ययनाच्या एवढ्या स्त्रोतापैकी अद्यायावत ज्ञान देणारे माहिती संप्रेषणाचे महत्वाचे साधन म्हणजे संगणक होय यात इंटनेटचा वापर तो कसा करायचा? ती माहिती प्रमाणिक आहे का हे कसे ठरवायचा? या सर्वांची माहिती विद्यार्थी व स्वत: अद्ययावत राहण्यासाठी आवश्यक आहे.

**भूमिका —**

(1) नवीन कौशल्ये, नवीन अध्यापन पध्दती, नवीन माहितीचे संघटन यांचे सात्यत्याने नुतनीकरण करण्याची गरज आहे.

(2) सेवातंर्गत शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तापूवर्ण असणे गरजेचे आहे. सर्व नवीन सेवापूर्व प्रशिक्षणात देता येणार नाही.

(3) विद्यार्थ्यांच्या विचार प्रक्रिया, सर्जनशीलता यांना आव्हान मिळेल अशी पाठ्यपुस्तक रचना करणे गरजेचे आहे यासाठी शिक्षकाने पुढाकार घ्यावा.

(4) शिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण व्हाव्यात यासाठी विविध प्रकारच्या मूल्यमापन तंत्राचे ज्ञान व ते वापरण्याचे कौशल्य शिक्षकाने प्राप्त करावे.

(5) शिक्षकाने स्वत:स असणारे ज्ञान, नवीन अद्ययावत माहिती, विविध माहिती स्त्रातोतून माहिती मिळवणे व ती उपयोात आणण्णे जरूरीचे आहे.

(6) ज्ञानाधिष्ठित समाजात आपल्या विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी शिक्षकोन स्वत: आपली तयारी करणे गरजेचे आहे तरच, विद्यार्थी हा स्वावलंबी व चौकस तयार होऊन उदयोन्मुख भारतातील प्रगत नागरिक म्हणून भूमिका पार पाडेल.